# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि-१३/४५/२०२३
दिनांक : ०५.०३.२०२३

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : सत्र २०२२-२०२३ मधिल स्पर्धक कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचे कलर कोट व मोनो महाविद्यालयीन हिस्स्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ विनियम क्रमांक १२/२०१९ मधील **UNIVERSITY COLOURS AND CERTIFICATES** चे तरतूदीनुसार दरवर्षी जे विद्यार्थी कलावंत व साथीदार आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतात व ज्या महाविद्यालयीन शिक्षकांना सदर चमूंचे व्यवस्थापक म्हणून नियुक्त करण्यात येते अशा सर्व विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांना प्रथमवर्षी कलर कोट व मोनो देण्यात येतो. ज्यांची चमूत पुन्हा निवड झाली असेल अशा खेळाडू विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांना केवळ मोनोच देण्यात येतो.

विद्यापीठ नियमानुसार विद्यापीठ युवा महोत्सव चमूतील विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचे कलर कोट व मोनोची रक्कम महाविद्यालय व विद्यापीठ यांचेवर समप्रमाणात विभागणी करण्यात आली आहे. त्याप्रमाणे सत्र २०२२-२०२३ मध्ये प्रथमतः निवड झालेल्या विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचे कलर कोट व मोनोकरीता एकूण किंमत **रुपये २३५७/- (अक्षरी रुपये दोन हजार तीनशे सत्तावन्न फक्त)** निश्चित झाली असून त्यानुसार महाविद्यालय हिस्सा व विद्यापीठ हिस्सा प्रत्येकी **रुपये १,१७९/- (अक्षरी रुपये एक हजार एकशे एकोणऐंशी फक्त)** विद्यापीठास **वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचे नांवे काढलेल्या बँक डिमांड ड्रॉफ्ट व्दारे किंवा धनादेशाव्दारे **दिनांक २५ मार्च, २०२३** पर्यंत जमा करावा व जमा करण्यात आलेल्या रकमेबाबतची पावती **संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांचे कार्यालयात पाठविण्यात यावी.

सत्र २०२२-२०२३ करीता विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूमध्ये प्रथमतः निवड/नियुक्ती झालेल्या विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचा महाविद्यालय हिस्सा प्रत्येकी **रुपये १,१७९/- (अक्षरी रुपये एक हजार एकशे एकोणऐंशी फक्त) दिनांक २५ मार्च, २०२३** जमा करावा ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपी माहितीकरीता सादर :-**
०१. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.